University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८.

क्र.परीक्षा/निकाल कक्ष/२९८/२०१६

परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापिठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक-नि-संचालक, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, विद्यापिठाच्या रत्नागिरी उपकेद्रांचे समन्वय व विद्यापिठाच्या ठाणे उपकेंद्राचे मानद सल्लागार यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शासनाने दुष्काळग्रस्त परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचे जाहिर केलेले आहे. या संदर्भात शासनाकडून निर्गमित करण्यात आलेले परिपत्रके/पत्र खालील प्रमाणे नमुद केलेले आहेत. व हे सर्व परिपत्रके/पत्र सोबत जोडलेली आहेत.

१) महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/अवर्षण/२०१५—१६/१२४८५ दि. ०३ डिसेंबर, २०१५.

२) महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग यांच्याकडील पत्र क्र.एससीवाय—२०१५/प्र.क्र.३११/म—७ मंत्रालय मुंबई—४०००३२ दि. ०९ नोव्हेंबर, २०१५.

३)महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एफईडी १५९२/१२०२/(११३२)/साशि—५ दि १८ ऑक्टोबर, १९९३.

४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन पुरक पत्र क्रमांक:शुल्क—५२१५/प्र.क्र.३७४/१५/मशि—२, दि. ०७ डिसेंबर, २०१५.

तरी आपणा सर्वांना विनंती करण्यात येते की, वरील परिपत्रकांमध्ये नमूद असलेल्या बाबींप्रमाणे आपल्या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करण्यासाठीची योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

आपला विश्वासू,

स्था. परीक्षा नियंत्रकाकरिता

मुंबई — ४०००९८
दि. १७ फेब्रुवारी, २०१६

प्रति :—

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापिठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, विद्यापिठाच्या रत्नागिरी उपकेद्रांचे समन्वय व विद्यापिठाच्या ठाणे उपकेंद्राचे मानद सल्लागार

अ. प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
१)वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग मुंबई विद्यापीठ, फोर्ट
२) उपकुलसचिव/मुख्य लेखापाल, वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, कलिना

ब. प्रत माहितीस्तव अग्रेषित :—
१. संचालक, सी.सी.एफ विभाग, परीक्षा विभाग
२. समन्वयक, परीक्षा विभाग
३. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग
४. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

क. प्रत माहितीस्तव अग्रेषित :—
१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
२. मा. कुलगुरू, यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र.कुलगुरू, यांचे स्विय सहायक
४. मा. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांचे स्विय सहायक आपला विश्वासू
५. कुलसचिव, यांचे स्विय सहायक

①


# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

Web : www.dhepune.gov.in E-mail : scholarshiphd@gmail.com

फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३


क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/अवर्षण/२०१५-१६/ 12485 दिनांक : ०१/१२/२०१५

3 DEC 2015

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

**विषय : सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत . . . . .**

संदर्भ : १. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग, क्र. एफईडी १५९२/१२०२/(११३२)/साशि-५,दिनांक १८ ऑक्टोबर, १९९३

२. शा.नि. महसूल व वन विभाग, क्र. एससीवाय-२०१५/प्र.क्र.३११/म-७, दि. २०.१०.२०१५

३. शासन परिपत्रक उच्च व तंत्र शिक्षण, क्र. शुल्क-५२१५/प्र.क्र.३७४/१५/मशि-२, दिनांक २४.११.२०१५

उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयाद्वारे ज्या गावांची अंतिम पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आहे अशा टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीची योजना लागू केली आहे. यात अकृषी विद्यापीठाकडून घेण्यात येणा-या परीक्षांचा समावेश आहे. उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये महसूल व वन विभागाने राज्यातील २०१५-१६ च्या खरीप हंगामात जिल्हाधिकारी यांनी ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी घोषित केलेल्या १४७०८ गावांमध्ये दुष्काळग्रस्त परिस्थिती जाहिर केलेली आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये दुष्काळग्रस्त परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचे जाहिर केलेले आहे. यास्तव सदर १४७०८ गावांमधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीसंदर्भात तात्काळ कार्यवाही करावयाची आहे. त्यानुसार आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात याव्यात.

१. संदर्भ क्र. १ येथील १८ ऑक्टोबर, १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे टंचाईग्रस्त गावातील सवलतीस पात्र असणा-या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदनपत्रे विद्यापीठाकडे संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या प्रमाणपत्रावर साक्षांकित करुन पाठवावे.

२. विद्यापीठाने आपल्याकडे प्राप्त झालेल्या टंचाईग्रस्त गावातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी ची प्रतिपूर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आलेल्या आवेदनपत्रावरुन प्रतिपूर्तीची रक्कम परिगणना करुन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे एकत्रित मागणी करावी.

(कृ.मा.प.)

३. सहसंचालक यांनी विद्यापीठाकडून आलेल्या माहितीनुसार आवश्यक रकमेची माहिती संचालनालयाकडे सादर केल्यानंतर संचालक स्तरावरुन सहसंचालक कार्यालयांना सदर योजनेसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल व सहसंचालक स्तरावरुन संबंधित रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

४. उपरोक्त शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी काही महाविद्यालयांनी टंचाईग्रस्त गावातील विद्यार्थ्यांकडून परीक्षा फी घेतली असल्यास सदर रक्कमेची मागणी आपल्या विभागातील विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, यांचेकडे करावी व सदर फी महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना परत करण्यात यावी.

५. कोणत्याही परिस्थितीत टंचाईग्रस्त गावातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी विद्यार्थ्यांकडून घेण्यात येऊ नये.

उपरोक्त प्रमाणे टंचाईग्रस्त गावातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफ करण्यासाठी विभागीय सहसंचालक यांनी आपल्या विभागातील जिल्हाधिकारी यांचेकडे संपर्क साधून अशा गावांची यादी प्राप्त करुन घ्यावी व ती संबंधित महाविद्यालय व विद्यापीठास उपलब्ध करुन द्यावी व त्यानुसार अशा गावातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी देण्याची कार्यवाही करण्यात यावी. ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी घोषित केलेल्या गावातील विद्यार्थी महाराष्ट्रातील कोणत्याही महाविद्यालयात शिकत असला तरी त्यास परीक्षा शुल्कात सवलत देण्यात यावी. सदर बाबत सहसंचालक यांनी आपल्या अधिनस्त सर्व महाविद्यालयास परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे. तसेच संचालनालयाचे दि. २६.११.२०१५ च्या पत्रान्वये मागविण्यात आलेली आवश्यक रकमेची मागणी तात्काळ संचालनालयास सादर करावी.
सोबत - संदर्भिय शासन निर्णय.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत - मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये विविध उपाययोजना जाहीर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

**शासन शुद्धीपत्रक क्रमांक :- एससीवाय- २०१५/ प्र.क्र. ३११ /म-७**

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- ०९ नोव्हेंबर, २०१५

**वाचा :-** शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१५/ प्र.क्र.३११/म-७,

दिनांक :- २० ऑक्टोबर, २०१५

**शासन शुद्धीपत्रक :-**

शासन निर्णय क्रमांक एससीवाय-२०१५/प्र.क्र.३११/म-७, दिनांक २०.१०.२०१५ अन्वये (परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमूद केल्यानुसार) राज्यातील सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील पिकांची हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेल्या १४७०८ गावांमध्ये (परिशिष्ट- अ) दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली होती. मात्र पिक कापणी प्रयोगानंतर नंदुरबार जिल्ह्यात ४१८, जळगाव जिल्ह्यात १२९८, अहमदनगर जिल्ह्यात ५८१ व बुलढाणा जिल्ह्यात १४२० या गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेली असल्यामुळे आता **१५७४७ गावांमध्ये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेली आहे.** त्यामुळे परिशिष्ट "अ" खालीलप्रमाणे वाचावे.

परिशिष्ट -"अ"

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | पैसेवारी जाहीर केलेली गावे | ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे | ५० पैशांपेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | ९०७ | ० | ९०७ |
| | | पालघर | ९८२ | ० | ९८२ |
| | | रायगड | १८८९ | ० | १८८९ |
| | | रत्नागिरी | १५१३ | ० | १५१३ |
| | | सिंधुदुर्ग | ७३७ | ० | ७३७ |
| | **एकूण** | | **६०२८** | **०** | **६०२८** |
| २ | नाशिक | नाशिक | १९६० | १५७७ | ३८३ |
| | | धुळे | ६७६ | ६१४ | ६२ |
| | | नंदुरबार | ८८५ | ४१८ | ४६७ |
| | | जळगांव | १५०१ | १२९८ | २०३ |
| | | अहमदनगर | ५८२ | ५८१ | ०१ |
| | **एकूण** | | **५६०४** | **४४८८** | **१११६** |
| ३ | पुणे | पुणे | १३०२ | ७६ | १२२६ |
| | | सातारा | १४९० | ३४३ | ११४७ |
| | | सांगली | ६३१ | ३६३ | २६८ |
| | | सोलापूर | प्रामुख्याने रब्बी जिल्हा असल्याने खरीप पिकांची पैसेवारी जाहीर केली जात नाही. | | |
| | | कोल्हापूर | १२१२ | ० | १२१२ |
| | **एकूण** | | **४६३५** | **७८२** | **३८५३** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | औरंगाबाद | औरंगाबाद | १३५३ | १३५३ | ० |
| | | जालना | ९६९ | ९६९ | ० |
| | | परभणी | ८४८ | ८४८ | ० |
| | | हिंगोली | ७०७ | ७०७ | ० |
| | | नांदेड | १५६२ | १५६२ | ० |
| | | बीड | १४०३ | १४०३ | ० |
| | | लातूर | ९४३ | ९४३ | ० |
| | | उस्मानाबाद | ७३७ | ७३७ | ० |
| | **एकूण** | | **८५२२** | **८५२२** | **०** |
| ५ | अमरावती | अमरावती | १९८१ | ० | १९८१ |
| | | अकोला | ९९७ | ५५ | ९४२ |
| | | यवतमाळ | २०५३ | २ | २०५१ |
| | | बुलडाणा | १४२० | १४२० | ० |
| | | वाशिम | ७९३ | ० | ७९३ |
| | **एकूण** | | **७२४४** | **१४७७** | **५७६७** |
| ६ | नागपूर | नागपूर | १७९८ | १११ | १६८७ |
| | | वर्धा | १३४० | ० | १३४० |
| | | भंडारा | ८४६ | ० | ८४६ |
| | | गोंदिया | ९२१ | ० | ९२१ |
| | | चंद्रपूर | १६६३ | ० | १६६३ |
| | | गडचिरोली | १४५२ | ३६७ | १०८५ |
| | **एकूण** | | **८०२०** | **४७८** | **७५४२** |
| **राज्याची एकूण** | | | **४००५३** | **१५७४७** | **२४३०६** |

सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५११२६१६२८२८८४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Ashok M Atram

Digitally signed by Ashok M Atram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e212845163abd708717bb4bef92b6886b147679a5af5a494e268689ab8d696dd, cn=Ashok M Atram
Date: 2015.11.26 16:32:07 +05'30'

(अशोक आत्राम)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त

२) सर्व जिल्हाधिकारी

राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची
विद्यापीठे व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी
माफ करण्याची योजना

---

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. एफईडी १५९२/१२०२/[३१३२]/माशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १८ ऑक्टोबर, १९९३.

-: शासन निर्णय :-

राज्यातील काही भागात गेली काही वर्षे सतत अवर्षण परिस्थिती निर्माण झाली होती. ज्या ज्या वेळी अशा अवर्षणाची परिस्थिती निर्माण झाली त्या त्या वेळी अवर्षणग्रस्त परिस्थितीचे निवारण करण्यासाठी शासनाने काही योजना कार्यान्वित केल्या होत्या. त्यापैकी शिक्षण विभागाचे संबंधित टंचाईग्रस्त भागातील इ.बी.सी. धारक विद्यार्थ्यांना "विद्यापीठे व परीक्षा मंडळे यांच्या परीक्षा फी माफीची सवलत" ही योजना तदर्थ स्वरुपात कार्यान्वित करण्यात आली होती. याकरिता लागणारा निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपलब्ध करण्यात येत असे. तथापि, अवर्षणाची परिस्थिती ही जवळ जवळ प्रतिवर्षी निर्माण होणारी बाब असल्याने, याबाबत एक नियमित स्वरूपाची योजना कार्यान्वित करावी असा निर्णय शासनाने घेतला असून, त्यानुसार १९९२-९३ च्या आर्थिक वर्षापासून, यापुढे ज्यावेळी किंवा ज्या वर्षी अवर्षणाची परिस्थिती राज्यातील ज्या भागात उद्भवेल, त्यासंबंधित टंचाईग्रस्त भागातील गरजू विद्यार्थ्यांना या योजनेखाली विद्यापीठे व परीक्षा मंडळे यांनी ठरविलेल्या परीक्षा फी माफीच्या सवलतीचा लाभ देण्यास शासन मंजूरी देत आहे.

टंचाईग्रस्त भागातील गरजू विद्यार्थ्यांना विद्यापीठे व परीक्षा मंडळे यांनी निश्चित केलेल्या परीक्षा फी च्या लाभाबद्दल खालीलप्रमाणे योजना मंजूर करण्यात येत आहे :-

[अ] योजनेचे स्वरुप :-

प्रतिवर्षी राज्यातील सर्व भागात खरीप हंगामातील व रब्बी हंगामातील पिकांची पैसेवारी ठरविण्यात येते. त्यावेळी ज्या गावाची अंतिम पैसेवारी ५० पेक्षा कमी असते ती, गावे टंचाईग्रस्त म्हणून जाहीर केली जातात. महसूल विभागाकडून विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन पिकांची गाववार अंतिम पैसेवारी जाहीर होते. या गावातील नावे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे उपलब्ध असतात./
या गावातील

इ.बी.सी. योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांना व [२] इ.१२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण या योजनेचा लाभ घेणा-या सर्व मुलींना ही योजना लागू राहील.

[ब] व्याप्ती:-

ही योजना खाली नमूद केलेल्या परीक्षा मंडळांच्या व राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांना लागू राहिल :-

[१] महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
[इ. १० वी व १२ वी परीक्षा]

[२] तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ.

[३] व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ.

[४] कला संचालनालय परीक्षा मंडळ.

[५] शासकीय परीक्षा मंडळाची डी.एड्. परीक्षा.

[६] व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व केंद्र शासनाकडून घेतल्या गेलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थानी घेतलेल्या व्यवसाय परीक्षा.

[७] कृषी व कृषीतर विद्यापीठांच्या परीक्षा.
[मुक्त विद्यापीठ वगळून]

[क] ही सवलत खालील विद्यार्थ्यांना लागू असणार नाही :-

[१] ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलती योजनेनुसार परीक्षा फी माफीची सवलत उपलब्ध आहे. [उदा. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत, माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांना माध्यमिक स्तरावर फी माफीची सवलत, प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना फी माफीची सवलत.]

[२] जे विद्यार्थी त्याच परीक्षेस दुस-यांदा बसले असतील.
[रिपिटर]

[३] जे विद्यार्थी बहि:स्थ [एक्सटर्नल] म्हणून नोंदले असतील.

[४] ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहातात, नोकरी धंदा करतात, परंतु त्यांचे नांवे गावी शेतजमीन आहे असे विद्यार्थी.

[ड] योजनेची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात यावी :-

१] अंतिम पैसेवारीनुसार अवर्षणग्रस्त म्हणून जाहीर होणा-या गावांची नावे संबंधित जिल्हा शिक्षणाधिका-यांने आपापल्या जिल्हाधिका-यांकडून तात्काळ प्राप्त करून घ्यावी व ती सूची

जिल्ह्यांतील सर्व शिक्षण संस्थांच्या [शाळा व महाविद्यालये] निदर्शनास योग्यप्रकारे तात्काळ आणावी.

२] त्यानंतर टंचाईग्रस्त भागातील सवलतीस पात्र असणा-या विद्यार्थ्यांनी परीक्षा फी माफीच्या सवलतीचा लाभ मिळावा म्हणून अर्ज शाळेच्या मुख्याध्यापकाकडे तात्काळ सादर करावेत.

३] इ. १० वी व १२ वी या परीक्षांसाठी अर्ज सादर करण्याची मुदत ही सर्वसाधारणपणे १ ऑक्टोबर अशी असते त्यामुळे या सवलतीस पात्र असणा-या विद्यार्थ्यांना त्यांनी भरलेल्या परीक्षा फीची प्रतिपूर्ती करावी लागेल. तेव्हा सवलतीस पात्र असणा-या सर्व विद्यार्थ्यांबाबतची माहिती शाळा/महाविद्यालयांच्या मुख्याध्यापकांनी फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्राप्त करुन घ्यावी.

४] फेब्रुवारीच्या दुस-या आठवड्यात पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी [माध्य.] यांचेकडे मुख्याध्यापक/महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी न चुकता पाठवावे.

५]जिल्हा शिक्षणाधिका-यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करुन एकत्रित प्रस्ताव २८/२९ फेब्रुवारीपर्यन्त आपल्या विभागांच्या विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे न चुकता पाठवावा.

६]विभागीय शिक्षण उपसंचालकांनी १० मार्चपर्यन्त त्यांच्या जिल्ह्यातील प्रस्ताव तपासून देय असलेल्या रकमेचे देयक शासकीय कोषागारातून पारित करुन घ्यावे व दर्शनी हुंडीव्दारे [डिमांड ड्राफ्ट] आवश्यक त्या रकमा संबंधित जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे सुपूर्द कराव्यात.

७] त्यानंतर जिल्हा शिक्षणाधिका-यांनी संबंधित शिक्षण संस्थामार्फत संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा फी ची रक्कम परत करावी व त्याचा अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे त्वरित पाठवावा.

८]ज्या परीक्षांच्याबाबत अर्ज सादर करण्याची मुदत ही डिसेंबर/जानेवारी अशी असेल [उदा. विद्यापीठाच्या परीक्षा] त्यांचेबाबत खालील पध्दत अवलंबण्यात यावी :-

सवलतीस पात्र असणा-या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या/शिक्षण संस्थेच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदनपत्र विद्यापीठाकडे/परीक्षा मंडळाकडे खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर स्वाक्षांकित करुन पाठवावे. त्य व बरोबर या विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती विवरण पत्रासह तयार करुन परीक्षा फी चा विस्तृत तपशील देऊन त्यांची बिले तयार करुन शिक्षणाधिका-यांमार्फत विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे सादर करण्यात यावीत.

# प्रमाणपत्र

======

प्रमाणित करण्यात येते की, वर यादीत दर्शविलेले परीक्षार्थी या महाविद्यालयात नियमित विद्यार्थी असून ते ------- या विद्यापीठाच्या मार्च १९ --- च्या परीक्षेला बसलेले आहेत. ते इ.बी.सी. धारक असून अवर्षणग्रस्त भागातील रहिवासी आहेत म्हणून ते परीक्षा फीची प्रतिपूर्ती करण्यास पात्र आहेत.

विभागीय शिक्षण उपसंचालकांनी अशा विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झाल्यानंतर जे विद्यार्थी सवलतीस पात्र ठरत असतील त्यांच्या परीक्षा फी ची प्रतिपूर्ती करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या रकमेचे डिमांड ड्राफ्ट तयार करुन ते विद्यापीठाकडे/ परीक्षा मंडळाकडे "प्रतिपूर्तीची रक्कम" म्हणून पाठवावेत.

या योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे हे पाहतील. या योजनेखाली होणारा खर्च "२२०२-सर्वसाधारण शिक्षण-८०, सर्वसाधारण ८०० इतर खर्च [तीस] (ए) अवर्षणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी/प्रतिपूर्ती करणे [२२०२ २५८८] मागणी क्र. -ई-२, या शिर्षाखाली त्या त्या वर्षी मंजूर केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. हा शासन निर्णय महसूल व वन विभाग यांच्याशी विचार विनिमय करुन व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भातील सहमती प्राप्त करुन त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.प्र.क्र. १०३४/९३/व्यय-५, दि.२८.५.९३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ अ.श्री. पाटील ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

शिक्षण संचालक, [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन पुरकपत्र क्रमांकः शुल्क-५२१५/प्र.क्र.३७४/१५/मशि-२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०७ डिसेंबर, २०१५

वाचा :- (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दिनांक १८.१०.१९९३.

(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.एफईडी-२००४/६३७६५/ (५१०/०४)/ केंपुयो, दिनांक २५ ऑक्टोबर,२००४.

(३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एससीवाय-२०१५/प्र.क्र.३११/म-७, दिनांक २० ऑक्टोबर, २०१५.

(४) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. शुल्क-५२१५/प्र.क्र.३७४/१५/मशि-२, दिनांक २४ नोव्हेंबर,२०१५.

(५) शासन शुध्दीपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एससीवाय-२०१५/प्र.क्र.३११/म-७, दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१५.

शासन पुरकपत्र :

उपरोक्त नमूद संदर्भ क्र.३ येथील महसूल व वन विभागाच्या दिनांक २० ऑक्टोबर,२०१५ च्या शासन निर्णयास अनुसरुन, सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या ,ज्या गावांची अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आहे अशा टंचाईग्रस्त भागातील १४७०८ गावांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीसंबंधी तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना संदर्भ क्र.४ येथील परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.आता या अनुषंगाने महसूल व वन विभागाने दि. ०९ नोव्हेंबर,२०१५ रोजी निर्गमित केलेल्या शासन शुध्दीपत्रकासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारीत आकडेवारी विचारात घेऊन १५७४७ गावातील महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीसंबंधी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२०७१४५२१३०५०८ असा आहे. हे पुरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Urmila Vaibhav Joshi

Digitally signed by Urmila Vaibhav Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Urmila Vaibhav Joshi
Date: 2015.12.07 14:53:36 +05'30'

(उर्मिला जोशी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी,
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३) सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण,
४) प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंतर् शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
५) सह सचिव (मशि) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंतर् शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
६) उप सचिव (म-७), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) कार्यासन अधिकारी (मशि-३), उच्च व तंतर् शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) निवडनस्ती (मशि-२).